# 'प्रयत्ने वाळूचे कण रगडिता

# तेलही गळे।

**'प्रयत्ने वाळूचे कण रगडिता तेलही गळे।'**

प्रयत्नांवर निष्ठा बाळगणारी माणसे प्रत्येक क्षेत्रात आपल्याला दिसून येतात. एखादा कलावंत आपल्या कलेत निपूण होतो, कारण त्यामागे त्याच्या प्रयत्नांची साधना, जिद्द व चिकाटी असते. मैदानावर खेळणारा खेळाडू जेव्हा यशस्वी होतो तेव्हा ते यश काही त्याला आपोआप प्राप्त होत नाही. त्यामागे त्याचे अथक प्रयत्न असतात. सरावाने त्यात तो प्रावीण्य मिळवतो व आपले इच्छित ध्येय गाठतो.जो माणूस प्रयत्न करीत राहतो त्याला मार्ग सापडतात.

'केल्याने होत आहे रे,

आधी केलेची पाहिजे।'

असे समर्थ रामदासांनी याच अर्थाने, म्हटले आहे. स्वराज्य स्थापनेच्या कार्याल शिवबांना कित्येक अडचणी आल्या, परंतु त्यांनी प्रयत्नांची कास कधीच सोडली नाही. आणि म्हणूनच महाराष्ट्रात 'हिंदवी स्वराज्य' अवतरले.

काही काही लोक आपल्या अपयशाचं खापर दुसऱ्यांवर फोडतात किंवा मग आयुष्यभर नशिबाला दोष देत बसतात. परंतु यशस्वी होणा-या व्यक्तीच्या कपाळावर लिहिलेले असते का हे यश ? 'नाही!' आपलं नशीब त्यांनी स्वतःच घडवलेलं असतं, आणि त्यासाठी कष्टाला पर्याय नाही.'असेल माझा हरी, तर देईल खाटल्यावरी!' हे खरे नाही.

आपल्या नशिबी जे लिहिलेले आहे, तेच घडणार असे मानणारे काही लोक आहेत त्यांचा स्वतःच्या प्रयत्नांवर विश्वास नसतो. असे अशी माणसे आतून दुबळी असतात. परिस्थितीपुढे हतबल होतात. म्हणून माणसाने आपल्या प्रारब्धावर नव्हे तर कष्टांवर, प्रयत्नवादावर विश्वास ठेवायला हवा.

आजकालच्या तरुण पिढीला बऱ्याचअंशी नैराश्याने घेरलेले दिसून येते. थोड्या- थोड्या अपयशाने खचून जातात. अपयश पचवण्याची क्षमता नसल्याने मनाचे संतुलन बिघडून नैराश्येच्या गर्तेत सापडतात. आपण अपयशीच आहोत या भावनेने पोखरले जातात, पण अपयशानंतरही एक संधी आपली वाट पाहत असते, त्या संधीतूनच आपल्या जीवनाचा भाग्योदय होणार असतो. फक्त एक वेळ यावी लागते अपयशाने आलेले नैराश्य वेळेबरोबर निघूनही जाते, हे या तरुण पिढीला कुठीतरी पटवून द्यायला हवे.

कोलंबस, वास्को-दी- गामा यांनी नव्या भूमीचा शोध लावला यत्नदेवाची आराधना करण्यास उपचारांचे अवडंबर लागल नाही, केवळ निष्ठेच्या देवतेची फूल वाहून पूजा करावी, यश आपल्यामागे धावत येईल.

प्रज्ञा पवार, मराठी विभाग